महाराष्ट्र शासन 

दूरध्वनी क्र. : २२७९३१०
Email: jalseven.wc@gmail.com

क्रमांक : सिनाब- २०१६/प्र.क्र.८४/जल-७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २९ फेब्रुवारी,२०१६

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. मुख्य अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण)
४. मुख्य अभियंता,विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम,नागपूर
५. सर्व अधीक्षक अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण)
६. सर्व कार्यकारी अभियंता,लघुसिंचन (जलसंधारण)
७. सर्व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी

विषय : जलयुक्त शिवार अभियानांतर्गत विशेष निधीतून करण्यात येत असलेल्या कामांच्या निविदा शर्ती संदर्भात.

संदर्भ : १) शासन निर्णय,क्र.जलशि-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७,दि.५.१२.२०१४
२)शासन पत्र क्र.जसअ-२०१५/प्र.क्र.७१/जल-७,दि.११ मे,२०१५
३) शासन पत्र क्र.जलशि-२०१५/प्र.क्र.३०/जल-७,दि. ५ फेब्रुवारी,२०१६

महोदय,

कृपया उपरोक्त संदर्भित पत्रे पहावीत.

२. जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत जिल्हा नियोजन विकास समितीच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आलेल्या विशेष निधीमधून तसेच टंचाई अंतर्गत निधीतून मार्च,२०१६ अखेर पर्यन्त टंचाईमुक्त करण्यासाठी साखळी सिमेंट नाला बांध व अन्य कामे करण्यासाठी निविदा प्रक्रीया कार्यान्वीत करण्यात आलेली आहे. या संदर्भात राज्यभरात काढण्यात येणाऱ्या निविदांमध्ये एकसूत्रता रहावी या उद्देशाने मुख्य अभियता,लघुसिंचन (जलसंधारण) यांनी प्रारुप टेंडर डॉक्यूमेंट तयार केले आहे. त्यानुसार राज्यभरामध्ये निविदा प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. या संदर्भात विदर्भ व नाशिक विभागातून प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने एका ठेकेदारास केवळ दोन क्लस्टरची कामे घेता येतील, ही अट शिथिल करण्यास शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली होती. तसेच कंत्राटदारांच्या सक्षमतेसंदर्भातील अटींमुळे ज्या ज्या ठिकाणी निविदेला नगण्य अथवा

अल्प प्रतिसाद मिळत आहे.त्या त्या ठिंकाणाकरीता संबंधीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यांत आलेल्या समितीने निविदेतील अटी आवश्यकतेनुसार शिथिल करण्याबाबत योग्य ती कारणमिमांसा देऊन त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्यास शासन पत्र क्रमांक जसअ-२०१५/प्र.क्र.७१/जल-७,दि.११ मे,२०१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

३. आता, अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद व नाशिक यांनी एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरची कामे देण्याबाबतची अट शिथिल करण्याची विनंती केली आहे. यापूर्वी दि.११ मे,२०१५ च्या शासन पत्रान्वये कळविण्यात आल्यानुसार टेंडर डॉक्यूमेंटमधील तांत्रिक बाबीसंदर्भात अटी व ठेकेदारांची क्षमता विचारात घेवून एका कंत्राटदारास दोनपेक्षा जास्त क्लस्टरची कामे न देण्याबाबतची अट शिथिल करण्याबाबतचा निर्णय घेण्यास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस अधिकार प्रदान करण्यात येत आहेत. मात्र, असे करीत असताना निविदेच्या मूळ गाभ्यात फरक पडणार नाही, याबाबतची दक्षता समितीने घ्यावयाची आहे.

Send mail
11/03/16.

आपला,

(ना.श्री.कराड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

C:\Users\sharad.patil\Desktop\Share Folder\...